# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

तिसरा मजला, कल्पतरु पॉईंट, सायन सर्कल जवळ,
सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२.
दूरध्वनी क्र. : २४०१ ०७०६ • फॅक्स : २४०२ ३५१६
ई-मेल : ms@mpcb.gov.in
संकेतस्थळ : www.mpcb.gov.in

**ई. रविंद्रन,** भा.प्र.से.
सदस्य सचिव


**क्रमांक : मप्रनि/सह.सं.(हप्रनि.)/** ब-४०९८ **दिनांक :** ०२.११.२०१८

## प रि प त्र क

विषय:- महाराष्ट्र राज्यातील पारंपारिक विट भट्टया(स्थान निश्चिती व उद्योग उभारणी) नियम २०१६ मध्ये सुधारणा करण्याबाबत...

संदर्भ:- १. महाराष्ट्र राज्यातील पारंपारिक वीट भट्टया ((स्थान निश्चिती व उद्योग उभारणी) नियम २०१६ प्रसिध्द एमपीसीबी/जेडी(एपिसी) सेक्शन/बी-३४९८, दिनांक २६/०८/२०१६.

२. मा.पर्यावरण मंत्री, यांच्याकडे दिनांक २८/०८/२०१८ रोजी कुभांर समाजाच्या पारंपारिक वीट भट्टी संदर्भात झालेल्या बैठकीचे इतिवृत्त

३. पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या पत्र क्रमांक बैठक -२०१८/प्र.क्र.१६१/तां.क.२, दिनांक १०/०९/२०१८.

४. अवर सचिव, पर्यावरण विभाग यांचे पत्र क्र. बैठक २०१८/प्र.क्र.१६१/तां.क.२, दिनांक ११/१०/२०१८.

हवा (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९८१ मधील कलम ५४ उपकलम (२) मधील परिशिष्ट-(झ) अन्वये राज्य शासन व म.प्र.नि.मंडळाच्या समन्वयाने अधिनियम क्रमांक एमपीसीबी-जेडी(एपीसी) सेक्शन/बी-३४९८ नुसार महाराष्ट्र शासन राजपत्राद्वारे प्रसारीत केलेल्या महाराष्ट्र राज्यातील पारंपारिक वीट भट्टया (स्थान निश्चिती व उद्योग उभारणी) नियम २०१६ मध्ये जनहितार्थ देण्यात आलेल्या सूचनेचे अवलोकन करुन, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या पत्र क्र. बैठक २०१८/प्र.क्र.१६१/तां.क.२,दिनांक ११/१०/२०१८ नुसार सदर अधिसूचनेमधील नियम क्रमांक ४ चे खालीलप्रमाणे स्पष्टीकरण करण्यात येत आहे.

"जे वीटभट्टीधारक ९X४X६ इंच आकाराच्या एकावेळी २५,००० नगांपेक्षा कमी वीटांची निर्मित्ती करीत असतील तसेच ९X४X३ इंच आकाराच्या एकावेळी ५०,००० नगांपेक्षा कमी वीटांची निर्मिती करीत असतील तसेच एकावेळेस वीटभट्टी लावल्यानंतर ३ दिवसांच्या अंतराने पुन्हा वीटभट्टी लावण्याची परवानगी सक्षम अधिका-याद्वारे घ्यावी. या सर्व वीटभट्टी धारकांनी पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ अंतर्भूत केंद्रीय वने व पर्यावरण विभाग, भारत सरकार यांनी पारित केलेल्या दिनांक १८/११/२००९ रोजीच्या राष्ट्रीय हवा गुणवत्ता मानकांचे पालन करणे त्यांच्यावर बंधनकारक राहील".

( ई.रविंद्रन,भा.प्र.से.)
सदस्य सचिव

प्रत माहितीसाठी सविनय सादर:-

१. खाजगी सचिव, मा. मंत्री, पर्यावरण, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
२. खाजगी सचिव, मा. राज्यमंत्री, पर्यावरण, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
३. मा. अध्यक्ष, म.प्र.नि.मंडळ, मुख्यालय, मुंबई
४. मा.प्रधान सचिव,पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई
५. सर्व मा.विभागीय आयुक्त,

६. सर्व मा.जिल्हाधिकारी.

७. सर्व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हापरिषद

८. संचालक,पर्यावरण विभाग,मंत्रालय, मुंबई

प्रत माहितीसाठी:-

१. सर्व विभाग प्रमुख, म.प्र.नि.मंडळ,मुंबई

२. विधी अधिकारी-१/२, विधीशाखा, म.प्र.नि.मंडळ, मुख्यालय, मुंबई

३. सर्व प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ,

४. सर्व उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ